सं. फौजदारी खटला क्र. **११८०/२०२२**
गजानन विरूद्ध वैजनाथ
**निशाणी ४१**

**बचाव पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ ची जबाणी**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | : | संतोष दत्तराव कोळेकर, |
| वय | : | ४८ वर्षे, |
| धंदा | : | उप—शाखा व्यवस्थापक, भारतीय स्टेट बॅंक, शाखा. तेल्हारा. |
| राहणार | : | ह.मु. तेल्हारा, ता. तेल्हारा, जि. अकोला. |

**सरतपासणी — आरोपी तर्फे ॲड श्री. एम. झेड. राठी यांचे मार्फत.**

मी बॅंकींग क्षेत्रात गेल्या ३० वर्षापासुन नौकरीस आहे. मला बॅंकेच्या दैनंदिन व्यवहाराची माहिती आहे. आमच्या बॅंकेचे व्यवस्थापक व उप—व्यवस्थापक यांना सारखेच अधिकार असतात. ग्राहकाला पुरवलेली माहिती आणि आमच्याकडे संगणकीय प्रणालीत उपलब्ध असलेली माहिती सारखीच असते. बॅंकेच्या अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती व बॅंकेच्या संगणकीय प्रणालीत उपलब्ध असलेली माहिती एकमेकांशी संलग्न असते. दस्त यादी निशाणी ३१ सोबत अनु क्र. १ वर आमच्या बॅंकेने आरोपीला पुरवलेला ०२/१०/२०२० ते १९/०७/२०२१ रोजीचा खाते उता—यातील माहिती ही आमच्या बॅंकेच्या संगणकीय अभिलेखाशी संलग्न असुन सदर माहिती खरी व बरोबर आहे.

**(आरोपीतर्फे काही दस्त हजर करावयाचे असुन त्यासाठी सरतपास तहकुब करावा अशी आरोपीतर्फे तोंडी विनंती करण्यात आली. सबब, तोंडी प्रस्तुत विनंतीवरून उर्वरित सरतपास पुढील तारखेपावेतो तहकुब.)**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**
(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.

दि. २५.११.२०२५
अकोट